**घाटकोपर, मुंबई येथील बेकायदेशीर फलक कोसळून झालेल्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याकरीता समिती गठीत करणेबाबत....**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्र. कल्याण-०५२४/प्र.क्र.१३१/पोल-७,**

दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १० जून, २०२४.

**<u>प्रस्तावना:</u>**

मुंबईमधील घाटकोपर येथील रेल्वेच्या जमिनीवर असलेले बेकायदेशीर फलक दिनांक १३ मे, २०२४ रोजी पेट्रोल पंपावर कोसळल्याने १६ व्यक्तींचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरातील जाहिरात फलक, विशेषत: शासकीय किंवा रेल्वे मालमत्तेवरील जाहिरात फलक यांची सुरक्षितता आणि कायदेशीरता याबाबत गंभीर चिंता निर्माण झाली असून अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घटनेसंदर्भात उच्चस्तरीय समयबध्द चौकशी करणे आवश्यक असल्याने या प्रकरणी शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय:</u>**

दिनांक १३ मे, २०२४ रोजी मुंबईमधील घाटकोपर येथील बेकायदेशीर फलक पेट्रोल पंपावर कोसळून १६ व्यक्तींचा झालेला मृत्यू या घटनेची समयबध्द चौकशी मा.श्री.दिलीप भोसले, निवृत्त मुख्य न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी सदर चौकशी समितीची रचना व समितीची कार्यकक्षा स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०६१०१४५९५००५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAYAK SADASHIV CHAVAN

Digitally signed by VINAYAK SADASHIV CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=3d6fb52eeb39bf3c4a0001ceaa97736aa6fb733903d657c4d7b6e66cdadfd6fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1DB7A03BD2B7B1CF5AFDC7A4A26DC14D44297AA2B63F7493C19351A3D51630D0, cn=VINAYAK SADASHIV CHAVAN
Date: 2024.06.10 15:13:00 +05'30'

**( विनायक चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
९) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
११) पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
१२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.
१३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती (पोल-७), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.